MHSO130016912013

## निशाणी क्र. ५३ वर आदेश

प्रतिवादीने वादीविरुध्द तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे कथन असे आहे की, वादी वाद जागेत राहत नाही किंवा तो वाद जागेचा वापर करीत नाही. प्रतिवादीने वादीविरुध्द प्रतिदावा दाखल केला आहे. वादीचे वारस धनाजी याने वाद जागेतील पिंपळाचे झाड विनापरवाना तोडले व वाद जागेतील परिस्थिती बदलण्याचा वादी प्रयत्न करीत आहे. जेव्हा प्रतिवादीने वादी धनाजी याला विचारले की, तु झाड का तोडले तेव्हा वादी प्रतिवादीच्या अंगावर धावुन आला व धमकी दिली की जे करायचे आहे ते कर. त्यामुळे वादी वाद जागेत थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. जर वादीला अंतरीम मनाई हुकूमच्या आदेशाप्रमाणे वाद मिळकतीची परिस्थिती बदलण्यास व थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करण्यास मनाई केली नाही तर प्रतिवादीचे अतोनात नुकसान होणार म्हणुन सदरचा अर्ज मंजुर करण्याची मागणी केली.

०२. वादीने निशाणी ५८ वर या अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्याचे असे म्हणणे आहे की त्याने वाद मिळकतीत कोणताही बदल केला नाही. तसेच वाद मिळकतीमध्ये थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करता येत नाही कारण मुळातच वाद मिळकत रामजी देशमुख यांच्या नावे होती व त्यानंतर प्रतिवादी यांच्या नावाने झालेली आहे. वादी हा वाद मिळकतीचा मालक नाही त्यामुळे तो थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करु शकत नाही. म्हणुन सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०३. खालील मुद्दे माझे निदर्शनास आले व त्यावर मी खालील प्रमाणे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रतिवादीच्या बाजुने प्रथमदर्शीनी प्रकरण आहे काय असे प्रतिवादी सिध्द करतात काय ? | नकारार्थी |
| २ | प्रतिवादीच्या बाजुने सोयीची बाजु आहे काय असे प्रतिवादी सिध्द करतात काय ? | नकारार्थी |
| ३ | जर सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होईल जे पैशात मोजण्यासारखे नाही असे प्रतिवादी सिध्द करतात काय ? | नकारार्थी |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ४ः

०४. वरील मुद्दे एकमेकांसोबत सुसंगत असल्यामुळे सर्व मुद्दे मी एकत्रितपणे कारणमिमांसेसाठी घेत आहे. दोन्ही पक्षांना ऐकले. वादीचा दावा, निशाणी ५३ चा अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. तसेच प्रतिवादीचा प्रतिदावा व दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या दस्तांचे अवलोकन केले. प्रतिवादीने निशाणी क्र.११ वर प्रतिदावा दाखल केला आहे व त्यात असे नमुद केले की वादीने प्रतिवादीची लेखी संमती न घेता व तसेच नगरपालिकेची संमती न घेता दोन खोल्यांचे अनधिकृत बांधकाम केले आहे. या अर्जात प्रतिवादीचे म्हणणे आहे की वादीने सदर मिळकतीमधील पिंपळाचे झाड तोडलेले आहे व वाद मिळकतीमध्ये बदल करण्याचा प्रयत्न करीत आहे.

प्रतिवादीने वाद मिळकतीच्या आजुबाजुला राहणा-या इसमांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही ज्यावरुन असे दिसु शकते की वादीने वाद मिळकतीत फेरबदल केलेला आहे. तसेच वादीने असे मान्य केले आहे की, प्रतिवादी वाद मिळकतीचे मालक आहे. जर प्रतिवादी वाद मिळकतीचे मालक असेल तर वादीच्या बाजुने वाद मिळकतीच्या मालकीबाबत कोणतेही दस्त नाही त्यामुळे वादी वाद मिळकतीमध्ये थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करु शकत नाही. हे प्रकरण २०१३ पासुन प्रलंबित आहे. जर वादीला थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करायचा असता तर आता पर्यंत केला असता. परंतु प्रतिवादीने असे कोठेही म्हटले नाही की, वादीने या या व्यक्तीसोबत करार केलेला आहे किंवा प्रतिवादीला असे माहित पडले की वादीने काही व्यक्तींसोबत वाद मिळकत विकण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. असे जर नसेल तर, वादीच्या विरुध्द अंतरीम मनाई आदेश देणे योग्य होणार नाही तसेच प्रतिवादीच्या बाजुने अंतरीम मनाई आदेश देण्यासारखे प्रथमदर्शनी प्रकरण नाही. म्हणुन सदरचा अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणन मी मुद्दा क्र.१ ते ३ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे व पुढील आदेश पारीत करत आहे;

## <u>आदेश</u>

१) प्रतिवादीचा निशाणी ५३ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जाचा खर्च दाव्यासोबत जोडण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित.)

Sd/-
(एस.बी. विजयकर)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बार्शी

बार्शी.
दिनांकः ०३/११/२०२३

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B. Vijaykar,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 03/11/2023 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 08/11/2023 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 08/11/2023 |